# कृषि पणन विषयक बातम्या : डिसेंबर 2025

महाॲग्रो

सकाळ ॲग्रोवन ६

शनिवार, २० डिसेंबर २०२५

## वाशीतून डाळिंबांचा पहिला कंटेनर अमेरिकेला रवाना

### पणनमंत्री जयकुमार रावल यांची माहिती; जागतिक स्पर्धेत टिकण्यासाठी शासन प्रयत्नशील असल्याची ग्वाही

**मुंबई :** "महाराष्ट्रात उत्पादित डाळिंबाच्या हंगामातील पहिला कंटेनर मुंबईतील जेएनपीटी बंदरातून समुद्रमार्गे अमेरिकेसाठी रवाना करण्यात आला आहे. कृषी पणन मंडळाच्या वाशी, नवी मुंबई येथील विकिरण सुविधा केंद्रावरून हा कंटेनर रवाना करण्यात आला असून राज्यातील फळनिर्यातीच्या दृष्टीने हा एक महत्त्वाचा टप्पा आहे," अशी माहिती पणन व राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांनी दिली.

जागतिक स्पर्धेत टिकेल अशी पणन व्यवस्था सक्षम करण्यासाठी शासन प्रयत्नशील असल्याचे श्री. रावल यांनी सांगितले. "महाराष्ट्रातील उत्पादित होणारी फळे, भाजीपाला आणि इतर शेतीमालाला राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय बाजारात स्पर्धात्मक दर मिळण्यासाठी जागतिक स्पर्धेत टिकेल अशी पणन व्यवस्था सक्षम करण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. आंबे, डाळिंबे, इतर फळे व भाजीपाला उत्पादक शेतकऱ्यांच्या मेहनतीला जागतिक बाजारपेठेत स्पर्धात्मक मूल्य मिळावे, यासाठी राज्य शासन, कृषी पणन मंडळ आणि



**मुंबई : अमेरिकेला निर्यात करण्यात आलेले डाळिंबे.**

केंद्र शासन प्रयत्नशील आहे. अमेरिकेसाठी जेएनपीटी बंदरातून हंगामातील पहिला डाळिंब कंटेनर रवाना होणे हे राज्याच्या कृषी-निर्यात क्षमतेसाठी तसेच शेतकऱ्यांना उत्पन्नवाढीच्या दृष्टीने प्रोत्साहित करण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे पाऊल आहे. येणाऱ्या काळात निर्यात सुविधा केंद्रातून मोठ्या क्षमतेने डाळिंब निर्यात केले जाणार आहेत," असेही श्री. रावले म्हणाले.

भारतीय डाळिंबांचा अमेरिकन बाजारपेठेतील वाटा वाढल्यास राज्यातील डाळिंब उत्पादक शेतकऱ्यांचे उत्पन्न २० ते ३० टक्क्यांपर्यंत वाढण्याची शक्यता असल्याचेही त्यांनी नमूद केले. यासाठी महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, अपेडा, एनपीपीओ व निर्यातदार अमेरिकन अधिकाऱ्यांसोबत सातत्याने तांत्रिक व धोरणात्मक पातळीवर कार्यरत आहेत.

#### ३०० टन डाळिंब निर्यातीचे नियोजन

कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांनी चालू २०२५-२६ हंगामात अमेरिकेस सुमारे ३०० टन डाळिंब निर्यातीचे नियोजन करण्यात आले असल्याची माहिती दिली. अमेरिकेतील बाजारपेठेत डाळिंबाची मागणी झपाट्याने वाढत असून, तेथील डाळिंब बाजारपेठ सध्या अंदाजे १.२ ते १.५ अब्ज अमेरिकी डॉलर इतकी आहे. विशेषतः भारतीय 'भगवा' व 'सुपर भगवा' जातींना चव, रंग व साखर-आम्ल संतुलनामुळे अधिक मागणी आहे.

#### डाळिंबांची प्रतवारी व प्रक्रिया आंतरराष्ट्रीय मानकांनुसार

२०१७-१८ मध्ये काही तांत्रिक कारणामुळे अमेरिकेला भारतातून डाळिंब निर्यात बंद झाली होती. परिणामी जवळपास सहा वर्षे भारतीय डाळिंब अमेरिकन बाजारपेठेत पोहोचू शकला नव्हता. निर्यात पुन्हा सुरू करण्यासाठी केंद्र शासनाच्या अपेडा व राष्ट्रीय वनस्पती संरक्षण संस्था (एनपीपीओ) यांनी अमेरिकेच्या कृषी विभागाशी (यूएसडीए) तांत्रिक व प्रशासकीय पातळीवर सातत्याने चर्चा करून कृषी पणन मंडळाच्या विकिरण सुविधा केंद्रावर आवश्यक चाचण्या घेऊन अहवाल सादर केले. पॅक-हाऊसमध्ये डाळिंबाची प्रतवारी व प्रक्रिया आंतरराष्ट्रीय मानकांनुसार करण्यात आली. त्यानंतर 'यूएसडीए' व 'एनपीपीओ' अधिकाऱ्यांच्या प्रत्यक्ष तपासणीनंतर विकिरण प्रक्रिया पार पाडण्यात आली. ४,८०० बॉक्सेसमधून १७,६१६ किलो (सुमारे १७.६ मेट्रिक टन) डाळिंब निर्यात करण्यात आली आहे.

सन २०२४ मध्ये अमेरिकेने निर्यातीसाठी काही शास्त्रीय निकष लागू केले आहेत. यामध्ये माईट वॉश प्रोटोकॉल, सोडिअम हायपोक्लोराइडद्वारे निर्जंतुकीकरण तसेच वॉशिंग व ड्रायिंग प्रक्रिया बंधनकारक करण्यात आली आहे. तसेच डाळिंबाचे चार किलो क्षमतेच्या प्रमाणित बॉक्समध्ये पॅकिजिंग करून अधिकृत विकिरण सुविधा केंद्रात विकिरण प्रक्रिया करण्यात आली आहे. या सर्व प्रक्रिया 'यूएसडीए' व 'एनपीपीओ' अधिकाऱ्यांच्या प्रत्यक्ष तपासणी व मान्यतेनंतरच पूर्ण केल्या गेल्या आहेत.

या प्रसंगी यूएसडीए निरीक्षक रॉबर्टो रिवाझ, एनपीपीओचे डॉ. बी.एल. मिना, कृषी पणन मंडळाचे विभाग प्रमुख अनिमेष पाटील, अपेडाचे बामणे तसेच संबंधित अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

Agrowon, 14/12/2026

# आंतरराष्ट्रीय दर्जाची कृषी बाजारपेठ उभारणार

## पणनमंत्री जयकुमार रावल यांची विधान परिषदेत माहिती

**विनोद इंगोले : ॲग्रोवन वृत्तसेवा**

**नागपूर :** "दिल्लीच्या आझादपूर मंडीमध्ये हरियानासह १५ राज्यांतीलशेतीमाल विकला जातो. त्याहीपेक्षा मोठी बाजारपेठ पालघर जिल्ह्यातील वाढवण पोर्टजवळ उभारली जाणार आहे. हे मार्केट पॅरिस, हेम्बर्ग आणि दुबईपेक्षा चांगले असेल," असा दावा पणनमंत्री जयकुमार रावल यांनी शनिवारी (ता. १३) विधान परिषदेत केला.



**जयकुमार रावल**

विधानसभा विधेयक क्रमांक ९३ (महाराष्ट्र कृषी उत्पन्न विकास व विनिमय सुधारणा २०२५) वर राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे शशिकांत शिंदे यांनी आक्षेप घेतला होता. त्यावरील चर्चेला उत्तर देताना पणनमंत्री रावल यांनी अनेक दावे केले. ते म्हणाले, की राष्ट्रीय बाजारामुळे सध्याची बाजार व्यवस्था संपुष्टात येईल, असा फेक नैरेटिव्ह पसरविण्याचा प्रयत्न विरोधकांकडून होत आहे. शेतकऱ्यांच्या मालाला किंमत मिळणार नाही, तिथे अडचण होईल, असा अपप्रचार केला जात आहे. मात्र नव्या व्यवस्थेतून शेतकऱ्यांचे व्यापक हीत साधले जाणार आहे. यातून शेतकऱ्यांचा कथित कैवार असलेल्या अनेकांची दुकाने बंद होणार असल्याने त्यांच्यामध्ये भीती निर्माण झाली आहे. केवळ टीआरपीसाठी नव्या बाजार व्यवस्था सुधारणेला विरोध केला जात आहे." पान ४ वर »

# आंतरराष्ट्रीय दर्जाची कृषी बाजारपेठ उभारणार

» पान १ वरून

असा आरोपही त्यांनी या वेळी केला.

"नव्या ब ाजार व्यवस्थेमध्ये शेतकरी संचालकांसाठी पूर्वीप्रमाणेच आरक्षण असणार असून, त्यात कोणता बदल केला जाणार नाही. संपूर्ण जगाला हेवा वाटेल अशी ही शेतीमालाची बाजारपेठ असेल," असा विश्वासही श्री. रावल यांनी या वेळी व्यक्त केला.

सदाभाऊ खोत, बंटी पाटील, अमोल मिटकरी, शशिकांत शिंदे हे या चर्चेत सहभागी झाले होते.

### 'विधेयक मंजूर करण्याला कोणतीच हरकत नाही'

"मुंबई बाजार समितीवर प्रशासक बसल्यानंतर तेथील काही संचालकांनी न्यायालयात धाव घेतली होती. दरम्यान, प्रशासक रद्द करून कार्यकाळ संपलेल्या संचालकांना मुदतवाढ देण्यात यावी, असे नवीन प्रकारचे जजमेंट मुंबई उच्च न्यायालयाने दिले. त्यानुसार तेथील प्रक्रिया सुरू असून कोणत्याही प्रकारची स्थगिती नाही. नागपूरच्या कळमना बाजाराच्या चौकशीला देखील स्थगिती असली तरी नव्या सुधारणांना कोणत्याच प्रकारची स्थगिती नाही. त्यामुळे हे विधेयक मंजूर करण्याला कोणतीच हरकत नाही," अशी भूमिका श्री. रावल यांनी मांडली.

Agrowon, 13/12/2026

# राष्ट्रीय बाजार विधेयक मंजूर

अॅग्रोवन वृत्तसेवा

नागपूर : राज्यातील शेतकऱ्यांना शेतीमालाला रास्त व वाजवी भाव मिळावा यासाठी 'ई-नाम' योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी आणि राष्ट्रीय बाजारतळ स्थापन करण्यासाठी महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ मध्ये सुधारणा विधेयक सुधारणांसह संमत करण्यात आले.

या विधेयकावर सत्ताधारी आणि विरोधी सदस्यांनी दीर्घ चर्चा केली. शेतीमालाला योग्य भाव मिळण्यासाठी पणन आणि कृषी विभाग महत्त्वाचा आहे. हे दोन विभाग वेगळे झाल्यामुळे कुणाचा कुणाला मेळ नाही, त्यामुळे कायदे करताना ते कृषी विभागाला गैरलागू ठरणार नाही हे ठरवावे. थेट पणन कायदा ३० वर्षांनंतर गैरलागू आहे असे वाटू लागले आहे, तसे या कायद्याचे होऊ नये, असे मत शरद सोनवणे यांनी मांडले. तर लहान लहान बाजार समित्या विशिष्ट मालाच्या खरेदी-विक्रीसाठी ओळखल्या जातात. त्यामुळे या बाजार समित्यांचे राष्ट्रीय बाजार संकल्पनेत काय अस्तित्व असणार, याची स्पष्टता यावी असे मत करवीरचे आमदार चंद्रदीप नरके यांनी व्यक्त केले.

खरेदी-विक्री व्यवहारात गैरव्यवहार झाल्यास किंवा फसवणूक झाल्यास दाद कुठल्या स्तरावर मागायची आणि त्याचा निकाल किती दिवसांत मिळणार याबाबत स्पष्टता यायला हवी असे मत व्यक्त केले.

दरम्यान, रणधीर सावरकर आणि समीर कुणावर यांनी राष्ट्रीय बाजार समितीमध्ये चारऐवजी पाच शेतकरी सदस्य अशी दुरुस्ती सुचविली. तसेच अनुसूचित जाती, जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती यातील एक महिला असेल हा मजकूर वगळण्याची सूचना केली. तसेच किरकोळ दुरुस्ती सूचवत विधेयक मान्यतेसाठी मांडण्यात आले.

मात्र बहुतांश सदस्यांनी या विधेयकावर बोलण्याची मागणी केली. मात्र पीठासन अधिकारी किशोर पाटील यांनी गोंधळात विधेयक मतास् टाकले. ते सत्ताधारी पक्षाने बहुमताच्या आधारे संमत करण्.

Agrowon, 12/12/2026

# साडेतेरा हजार शेतकरी करणार डाळिंब निर्यात

## सर्वाधिक नोंदणी सोलापूर जिल्ह्यात; इतर राज्यांतून कमी प्रतिसाद

अभिजित डाके : ॲग्रोवन वृत्तसेवा

**सांगली :** राज्यात यंदा सप्टेंबर, ऑक्टोबर महिन्यांत झालेल्या अतिवृष्टीचा फटका डाळिंब बागांना बसला. परिणामी उत्पादन आणि दर्जेदार फळे कमी प्रमाणात हाती लागत असल्याचे चित्र आहे. अशा परिस्थितीतही शेतकऱ्यांनी डाळिंबाच्या निर्यातीसाठी पुढाकार घेतला आहे. या वर्षी आतापर्यंत १३ हजार ७७२ शेतकऱ्यांनी निर्यातीसाठी नोंदणी केली असून, आणखी संख्या वाढीचा अंदाज कृषी विभागाने व्यक्त केला आहे. राज्यातून गेल्या वर्षी डाळिंबाची निर्यात करण्यासाठी सुमारे २२ हजार शेतकऱ्यांनी (मार्चपर्यंत) नोंदणी

### जिल्हानिहाय निर्यातीसाठी झालेली नोंदणी



| | | | |
|---|---|---|---|
| अहिल्यानगर | ६९९ | नाशिक | १५ |
| छ. संभाजीनगर | १४ | पुणे | २२८५ |
| बुलडाणा | ३ | सांगली | १२३७ |
| धुळे | २९ | सातारा | २ |
| जळगाव | १४ | सोलापूर | ९४७४ |

एकूण...१३७७

# साडेतेरा हजार शेतकरी करणार डाळिंब निर्यात

» पान १ वरून

तर, गेल्या वर्षभरात सुमारे १९,६७६ टन डाळिंब निर्यात झाली होती. वास्तविक, गेल्या तीन ते चार वर्षांपासून डाळिंबावर नैसर्गिक संकटांची मालिका सुरू असतानाही शेतकरी निर्यातीसाठी पुढाकार घेत असल्याचे चित्र आहे. युरोपियन देशासह आखाती, बांगलादेशात निर्यात मोठ्या प्रमाणात होते.

राज्यातून यंदाच्या हंगामात डाळिंब निर्यातीसाठी नोंदणी सुरू आहे. ११ हजार २७ शेतकऱ्यांनी निर्यातीसाठीच्या परवान्यांचे नूतनीकरण केले आहे, तर २७२४ शेतकऱ्यांनी नवीन परवाने घेतले आहेत. यंदा मे महिन्यापासून सुरू असलेल्या पावसाने डाळिंबाच्या हंगामाचे नियोजन विस्कळित केले. त्यातूनही शेतकऱ्यांनी बागांचा बहर धरला. त्यानंतर पावसाचा जोर कमी झाल्याने शेतकऱ्यांना दिलासा मिळाला.

> हवाई आणि समुद्रामार्गे डाळिंबाची निर्यात डाळिंब संशोधन केंद्र व अपेडाच्या सहकार्याने सुरू झाली आहे. त्यामुळे राज्यातून डाळिंब निर्यातीला मोठी संधी आहे. शेतकऱ्यांनी रेसिड्यू फ्री डाळिंबाचे उत्पादन घेणे महत्त्वाचे ठरणार आहे.
>
> - **डॉ. राजीव मराठे,**
> संचालक, राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्र, सोलापूर

### सर्वाधिक नोंदणी महाराष्ट्राची

महाराष्ट्रापेक्षा या राज्यांतून निर्यात करणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या कमीच असते. यंदाच्या हंगामातही अशीच काहीशी परिस्थिती असल्याचे चित्र आहे. आंध्र प्रदेश, गुजरात, कर्नाटक, महाराष्ट्र, राजस्थान आणि तमिळनाडू या राज्यांतून एकूण १३ हजार ८२४ शेतकऱ्यांनी आतापर्यंत निर्यातीसाठी नोंदणी केली आहे. अर्थात महाराष्ट्रातून सर्वाधिक नोंदणी झाली असल्याचे अपेडाच्या माहितीवरून स्पष्ट होत आहे. राज्यातील डाळिंबाला जगातील बाजारपेठेत मोठी मागणी असते.

सकाळ अॅग्रोवन ४
बुधवार, १० डिसेंबर २०२५



नागपूर : राज्य व्यापारी कृती समितीच्या बैठकीत सोमवारी (ता. ८) राज्य समन्वयक राजेंद्र बाठिया आणि व्यापारी प्रतिनिधींनी पणनमंत्री जयकुमार रावल यांचा सत्कार केला.

# राष्ट्रीय बाजाराद्वारे शेतीमालास आंतरराष्ट्रीय बाजारपेठ मिळवून देऊ

## पणनमंत्री रावल : व्यापारी कृती समितीसोबत बैठकीत

अॅग्रोवन वृत्तसेवा

पुणे : राज्यातील मोठ्या बाजार समित्यांचा राष्ट्रीय बाजारामध्ये समावेश करून त्याद्वारे शेतकऱ्यांच्या शेतीमालास आंतरराष्ट्रीय बाजारपेठ मिळवून दिली जाईल, असा विश्वास पणनमंत्री जयकुमार रावल यांनी व्यक्त केला.

राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संदर्भातील व्यापाऱ्यांच्या विविध प्रश्नांबाबत पणन मंत्री रावल यांच्या अध्यक्षतेखाली सोमवारी (ता. ८) नागपूर येथे महाराष्ट्र राज्य व्यापारी कृती समितीसोबत आढावा बैठक झाली. या बैठकीला कृषी पणन मंडळाचे संचालक संजय कदम, पणन सहसचिव विजयकुमार लहाने, सहसंचालक राजेंद्र दराडे यांच्यासह दि पूना मर्चंट्स चेंबरचे अध्यक्ष राजेंद्र बाठिया, माजी अध्यक्ष रायकुमार नहार, नवीन गोयल, फॅमचे सचिव प्रीतेश शहा, ग्रोमाचे अध्यक्ष भीमजी भानुशाली, कॅमेटेचे अध्यक्ष दिपेन अगरवाल, भुसार आडत व्यापार संघ सोलापूरचे अध्यक्ष सुरेश चिक्कळी, सांगली चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष अमरसिंह देसाई व शरद शहा, दि बारामती मर्चंट्स असो.चे अमोल शहा, नीलेश दोशी व नीलेश भिंगे, गोंदिया जिल्हा व्यापारी फेडरेशनचे अध्यक्ष किरण मुंदडा, अपूर्व अगरवाल, औरंगाबाद मर्चंट्स असोसिएशनचे अध्यक्ष हरीश पवार व सचिव राकेश जैन, नाशिक किराणा घाऊक व्यापारी संघटनेचे अध्यक्ष प्रफुल्ल संचेती, सुनील मुंदडा, विविध संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

Agrowon, 09/12/2026

# राष्ट्रीय बाजार विधेयक सादर

## पणन मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली असेल समिती

ॲग्रोवन वृत्तसेवा

नागपूर : राज्यातील शेतकऱ्यांच्या शेतीमालाला रास्त व वाजवी भाव मिळावा यासाठी 'ई-नाम' योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी आणि राष्ट्रीय बाजारतळ स्थापन करण्यासाठी महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ मध्ये सुधारणा करण्याबाबतचे विधेयक विधानसभेत मांडण्यात आले. पणनमंत्री जयकुमार रावल यांनी हे विधेयक सोमवारी (ता. ८) मांडले.

या विधेयकामध्ये पणनमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली सरकारी अधिकारी आणि तज्ज्ञांची समिती प्रस्तावित केली आहे. केंद्र व राज्य शासन, कृषी उत्पन्न बाजार समितीतील कृषी उत्पन्नाच्या व्यापारामधील अडसर कमी व्हावे यासाठी राज्यातील १३३ कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये ई-नाम योजना राबविण्यात येत आहे. कृषी उत्पन्नाच्या व्यापारासाठी ऑनलाइन पद्धती कार्यान्वित करीत आहे.

पान ४ वर »

### अशी असेल समिती

राष्ट्रीय बाजारासाठी नेमण्यात येणाऱ्या समितीचे अध्यक्ष पणनमंत्री असतील तर उपाध्यक्ष कृषी आयुक्त किंवा सहसंचालक दर्जाचा अधिकारी असेल. कार्यकारी संचालक कृषी पणन मंडळ किंवा सहकार विभागाचा सहनिबंधक असेल. महत्त्वाच्या बाजारातील चार शेतकरी, आवश्यक असल्यास अन्य राज्यातील एक एक शेतकरी, तीन लायसन्सधारक व्यापारी, कृषी प्रक्रिया उद्योगातील व्यक्ती किंवा भागीदार, आयात निर्यात क्षेत्रातील तज्ज्ञ आणि निमंत्रित सदस्य असे संचालक मंडळ असेल.

नागपूर करारानुसार हिवाळी अधिवेशन घ्या ...पान १६

# राष्ट्रीय बाजार विधेयक सादर

» पान १ वरून

पण अजूनही राज्यात ई-नाम अंतर्गत 'सिंगल युनिफाईड लायसन्स'ची तरतूद नसल्याने आंतरराज्यीय बाजार व आंतरराज्य व्यापार सुरू होऊ शकलेले नाहीत. केंद्र शासनाच्या कृषी व शेतकरी कल्याण विभागाने कृषी उत्पन्न आणि पशुधन पणन (प्रचालन व सुविधा) अधिनियम, २०१७ (मॉडेल ॲक्ट) प्रकाशित केला आहे. या अनुषंगाने राज्याच्या महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ मध्ये सुधारणा करण्यासाठी २०१८ च्या हिवाळी अधिवेशनात विधेयक मांडण्यात आले होते.

विधेयकातील तरतुदींबाबत सुधारणांसाठी मंत्रिमंडळ उपसमिती स्थापन करण्यात आली होती. या उपसमितीने सुधारणांची शिफारस केली होती. त्यानुसार केंद्राच्या मॉडेल ॲक्ट मधील तरतुदीनुसार राज्यातील ज्या मोठ्या बाजार समित्यांकडे अन्य किमान दोन राज्यांतून शेतमाल येतो, अशा बाजार समित्यांना राष्ट्रीय नामांकित बाजार समित्या घोषित करण्याची तरतूद करण्यात येणार आहे. ज्या बाजारातून शेतीमालाची खरेदी विक्री केली जाते त्या कोणत्याही बाजारास राष्ट्रीय बाजार म्हणून घोषित करण्याची तरतूद प्रस्तावित विधेयकात आहे.

एफपीसी महापरिषद

पादक कंपन्यांच्या
देणारी 'सकाळ
एकदिवसीय
महापरिषद आज
हे. या महापरिषदेत
ोतकरी उत्पादक
ड्भागी होत आहेत.
तकरी उत्पादक
ोबाबत मान्यवर
ा ऊहापोह.

# महाराष्ट्राला बनविणार 'ग्लोबल हॉर्टिकल्चर हब'



हवामान बदलांच्या संकटांवर मात करत, निर्यातक्षम फळे भाजीपाला उत्पादन आणि निर्यातीतून शेतकऱ्यांना आणि महाराष्ट्राला समृद्ध करण्यासाठी राज्यात पणन विभाग आणि आशियायी विकास बँकेच्या अर्थसाह्याने 'मॅग्रेट' प्रकल्प राबविला जात आहे. यामध्ये शेतकरी उत्पादक कंपन्यांना प्रोत्साहन दिले जात आहे. पहिल्या टप्प्याच्या यशस्वितेनंतर आता दुसरा टप्पा सुरू झाला आहे. हा दोन्ही टप्प्यांतून महाराष्ट्राला 'ग्लोबल हॉर्टिकल्चर हब' करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. याबाबत प्रकल्पाचे अध्यक्ष आणि पणनमंत्री **जयकुमार रावल** यांच्याशी केलेली बातचीत.

मुलाखत

गणेश कोरे

## ? मॅग्नेट प्रकल्पाचा उद्देश काय आहे?

महाराष्ट्रातील शेतकरी कष्टाळू आणि प्रयोगशील आहे. शेतकरी हवामान बदलांसह विविध संकटांवर मात करत फळे- भाजीपाला यांचे उत्पादन घेत आहे. मात्र त्यास समाधानकारक दर मिळत नाही. ही समस्या ओळखून शेतीमालाला चांगला दर मिळावा, मालाचे मूल्यवर्धन व्हावे, त्याची निर्यात व्हावी यासाठी २०२१ पासून प्रकल्प कार्यान्वित झाला. महाराष्ट्र अॅग्रीबिझनेस नेटवर्क (मॅग्नेट) प्रकल्प असे त्याचे नाव असून आशियायी विकास बँकेच्या १०० दशलक्ष डॉलरच्या अर्थसाह्यातून तो सुरू आहे. या प्रकल्पातून शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या माध्यमातून फलोत्पादनामध्ये एकात्मिक पायाभूत सुविधांची निर्मिती, मूल्यवर्धन, कृषी-उद्योगांचा विकास, आधुनिक तंत्रज्ञान, निर्यात बाजारपेठेसाठी सज्जता, बाजार जोडणी, क्षमता बांधणी या बाबींवर विशेष भर देण्यात आला आहे.

## ? प्रकल्पात प्रामुख्याने कोणत्या पिकांचा समावेश झाला आहे?

महाराष्ट्रातील कृषी हवामान विभागांनुसार प्रमुख नगदी पिकांचा समावेश करण्यात आला आहे. यामध्ये पहिल्या टप्प्यात राज्यातील प्रमुख १४ फळपिके आहेत. यात डाळिंब, केळी, संत्रा, मोसंबी, सीताफळ, पेरू, चिकू, स्ट्रॉबेरी, भेंडी व मिरची (हिरवी व लाल), आंबा, काजू, लिंबू, पडवळ, सर्व प्रकारची फुले अशा एकूण १५ एकात्मिक मूल्यसाखळ्यांचा विकास मॅग्नेट प्रकल्पांतर्गत करण्यात आला आहे.

## ? प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात काय फायदे झाले? किती निधी वितरित झाला?

पहिल्या टप्प्यात राज्याच्या फलोत्पादन क्षेत्राला लक्षणीय यश मिळाले. काढणीपश्चात हाताळणी शास्त्रशुद्धपणे होण्यासाठी पायाभूत सुविधांसाठी ७१ उप-प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली. यामध्ये ४८ शेतकरी उत्पादक संस्था आणि २३ मूल्य साखळी गुंतवणूकदारांचा समावेश आहे. एकूण १९७ कोटी ६८ लाख रुपयांचे साह्य अनुदान स्वरूपात मंजूर केले असून पैकी ६४ कोटी ७७ लाख रुपये अनुदान वितरित झाले आहे. त्यातून ७१ एकात्मिक पॅकहाउस आणि सुमारे ४७ हजार ८०० टन क्षमतेची आधुनिक शीतगृह उभारणी प्रगतिपथावर आहे. या सुविधांमध्ये प्री-कूलिंग युनिट्स, फ्रोजन चेंबर्स, यांत्रिक ग्रेडिंग लाइन्स आणि ४८ शीतवाहनांचा समावेश आहे. या सुविधांद्वारे दररोज अंदाजे साडेसतराशे टन शेतीमाल हाताळला जात आहे. सुमारे नव्वद हजारांहून अधिक छोट्या व सीमांत शेतकऱ्यांना थेट लाभ मिळत आहे. याद्वारे सुमारे दोन हजार वार्षिक रोजगार निर्माण झाले आहेत.

## ? मॅग्नेट प्रकल्पाचा दुसरा टप्पा कसा असणार आहे?

प्रकल्पाची सद्यःस्थितीतील प्रगती विचारात घेउन आशियायी विकास बँकेमार्फत विस्तारित दुसरा टप्पा सुरू करण्याबाबत सुचविले आहे. तो अधिक व्यापक, तंत्रज्ञान-आधारित आणि निर्यातीला चालना देणारा तसेच राज्याच्या दीर्घकालीन कृषी विकास धोरणाशी सुसंगत आहे. यामध्ये द्राक्षे, पपई, फणस, अंजीर, हळद, आले, शेवगा आणि टोमॅटो या आठ उच्च-मूल्यांकित पिकांचा समावेश केला आहे. त्याअंतर्गत मूल्यवर्धन, प्रक्रिया, हवामान-अनुकूलता आणि 'डिजिटायझेशन' यावर भर दिला जाईल. आर्थिक पुरवठ्याची व्याप्ती वाढवून द्वितीय व तृतीय स्तर प्रक्रिया उद्योगांचा समावेश केला जाईल. सौरऊर्जा आधारित, कमी-कर्ब उत्सर्जक शीतसाखळी प्रकल्प, दळणवळण (लॉजिस्टिक्स), कचरा व्यवस्थापन आणि 'कार्बन फार्मिंग' यामध्ये गुंतवणूक केली जाईल. महिलांच्या व आदिवासी बहुल भागातील शेतकरी उत्पादक संस्थांसाठी विशेष प्राधांन्याच्या योजना राबविल्या जातील. महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे येथे कृषी-व्यवसायास प्रोत्साहन व सुलभता येण्यासाठी संस्थात्मक उपाययोजना केल्या जातील. यात बाजार जोडणी कक्ष, निर्यात सुविधा केंद्र, बाजार माहिती व विश्लेषण कक्ष, प्रकल्प सल्ला सेवा विभाग या चार कक्षांचा समावेश आहे. समृद्धी महामार्ग आणि वाढवण बंदर यांच्याशी संलग्न अॅग्री -लॉजिस्टिक्स हब्स उभारण्यावर भर दिला जाईल. महाराष्ट्राला जागतिक फलोत्पादन केंद्र म्हणून विकसित करणे हे विस्तारित टप्पा मॅग्नेट २ चे मुख्य उद्दिष्ट आहे.

## ? प्रकल्पातील सहभागामुळे नाशिवंत मालाचे कसे मूल्यवर्धन झाले?

काढणीपश्चात व्यवस्थापनातील त्रुटी दूर होऊन मूल्यवर्धनाला मोठी चालना मिळाली. आधुनिक एकात्मिक पॅकहाउसेस, ग्रेडिंग- सॉर्टिंग-वॉशिंग लाइन्स, कोल्ड स्टोअरेज, प्री-कूलिंग आणि रिफर व्हॅन्स यांच्या उभारणीमुळे शेतीमालाच्या गुणवत्तेत सातत्य आले. परिणामी, काढणीपश्चात नुकसान लक्षणीयरीत्या घटले. मालाची टिकवणक्षमता वाढली. शेतकऱ्यांना चांगला दर मिळणे शक्य झाले. सौर वा 'बायोमास' आधारित कोल्ड-स्टोअरेज, सेन्सर्स आणि ड्रोन-फवारणी आदी आधुनिक तंत्रज्ञानामुळे कार्यक्षमता आणि शाश्वतता वाढली. विविध केंद्रीय कृषी संशोधन संस्था आणि सह्याद्री फार्म्स नाशिक) यांच्या सहकायनि नावीन्यपूर्ण पॅकिंजिंग व नव्या प्रक्रिया उत्पादनांना चालना मिळाली. डाळिंब ज्यूस पावडर, केळीच्या खुंटापासून चारकोल, संत्र्याच्या टँगोसारखे नवे वाण यांना चालना मिळाली. त्यामुळे शेतकरी उत्पादक कंपन्या केवळ संकलन केंद्रे न राहता मूल्याधिष्ठित उद्योग म्हणून नावारूपाला येत आहेत. त्यांना संघटित रिटेल व निर्यात बाजारपेठेत प्रवेश मिळत आहे. त्याचा थेट फायदा शेतकऱ्यांना होत आहे.

## ? प्रकल्पातून थेट निर्यातीला कशी चालना मिळू शकेल?

प्रकल्प महाराष्ट्राला देशातील अग्रगण्य फलोत्पादन निर्यातदार राज्य बनवण्यासाठी धोरणात्मक पावले उचलत आहे. पहिल्या टप्प्यात केळी, डाळिंब आणि मिरची या पिकांसाठी निर्यात प्रोटोकॉल विकसित करण्यात आले. विशेष म्हणजे रशियाला २२ मे. टन केळीची प्रायोगिक तत्त्वावर यशस्वी व्यावसायिक निर्यात करण्यात आली. प्रायोगिक तत्त्वावर आणखी दोन व्यावसायिक चाचण्या केल्या जाणार आहेत. कृषी पणन मंडळाच्या सुविधांमध्ये आता अपेडा प्रमाणित पायाभूत सुविधा उपलब्ध आहेत. त्यात प्री-कूलिंग, ग्रेडिंग, ट्रेसेबिलिटी आणि कंटेनर लोडिंग क्षमता यांचा समावेश आहे. युरोपीय बाजारपेठांचे अभ्यासदौरे, ५० हून अधिक सामंजस्य करार, व्यापार मेळावे, प्रदर्शनांमध्ये सहभाग आणि बायर-सेलर संमेलनांच्या माध्यमातून जागतिक बाजारपेठेशी थेट संपर्क प्रस्थापित झाला आहे. मॅग्नेट २ अंतर्गत स्वतंत्र निर्यात सुविधा केंद्र, पीकनिहाय बाजार प्रवेश आराखडा, ट्रेसेबिलिटी सिस्टिम्स (पुरवठा साखळी मागोवा प्रणाली), सिम्युलेशन ट्रायल्स (निर्यात पूर्व चाचण्या), पोर्ट-लॉजिस्टिक्स एकत्रीकरण (समृद्धी कॉरिडॉर व वाढवण बंदर) या बाबींवर भर देण्यात येणार आहे. या सर्व निर्यातपूरक उपाययोजनांमुळे शेतकरी उत्पादक संस्थांना मध्यस्थांशिवाय थेट आंतरराष्ट्रीय बाजारात माल पाठवणे आणि अधिक नफा मिळवणे शक्य होणार आहे.

## ? शेतकरी उत्पादक कंपन्यांना प्रोत्साहन देण्यासाठी आणखी कोणत्या योजना नियोजित आहेत?

मॅग्नेट टप्पा २ अंतर्गत शेतकरी उत्पादक संस्थांना अधिक स्पर्धाक्षम, आर्थिक दृष्ट्या सक्षम, बाजाराभिमुख करण्यासाठी अनेक नव्या योजना प्रस्तावित आहेत. यातील सर्वांत प्रमुख योजना म्हणजे महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळामध्ये संस्थात्मक सल्लागार कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. त्यात शेतकरी उत्पादक संस्थांसाठी उच्च दर्जाचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे, आर्थिक प्रारूपे, व्यवसाय आराखडे, शेतकरी उत्पादक संस्थांना आव्हानात्मक ठरणा-या विविध कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी मार्गदर्शन आदींचा समावेश आहे. शेतकरी उत्पादक संस्थांचा संस्थात्मक क्षमता विकास साधण्यासाठी चांगले कामकाज करणाऱ्या आदर्श शेतकरी उत्पादक संस्थांचे जाळे विस्तारित करण्यात येणार आहे. त्यायोगे या संस्था विभागीय पातळीवर पथदर्शी संस्था म्हणून कार्य करतील. प्रशिक्षण, संकलन, तंत्रज्ञान प्रात्यक्षिक, विपणन यासाठी त्या अन्य संस्थांना मदत करतील. मॅग्नेट २.० अंतर्गत द्वितीय व तृतीय स्तर प्रक्रिया उद्योगांसाठी भरीव आर्थिक तरतूद आहे. त्यात निर्जलीकरण, शीतकरण, मसाले प्रक्रिया, फलोत्पादन आधारित मूल्यवर्धित उत्पादनांना प्रोत्साहन देण्यात येईल. सहभागी आर्थिक संस्थांच्या माध्यमातून सवलतीच्या दरात खेळते भांडवल, आदान प्रदान (Input Procurement) आणि हंगामी आर्थिक गरजांसाठी लवचिक कर्ज योजना कार्यान्वित करण्यात येईल. क्षमता बांधणी कार्यक्रमांची पुनर्रचना करून त्यात संगणकीय साक्षरता, आर्थिक व्यवस्थापन, निर्यातीसाठी कागदपत्रांची परिपूर्ती, सुशासन व बदलत्या हवामानाला तग धरू शकेल अशी पीकपद्धती यांचा समावेश असेल.



...ठा मिळविण्याच्या प्रयत्नात यशस्वी होत आहेत.